# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र.   10 / 2023          दिनांक : 07.01.2023

## 1)अवैध रेती चोरी :–

**1)सोनखेड :–**दिनांक 05.01.2023 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **बामणी कॅनॉल (मायनर) श्री संजय किशनराव साधु रा. नांदेड यांचे शेत शिवार मौ. सोनखेड शिवार व सुमित पेट्रोलपंप ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन बिना परवाना बेकायदेशिरीत्या हायवा टिपर क्रं एमएच–06 / बीटी–9945 च्या चालकाने त्यांचे मालकाचे मदतीने शासनाचे ताब्यातील गौण खनिज वाळु उपसा करून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना व विद्युत वितरण कंपणीचे तीन पोल व वायर तोडुन नुकसान केलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी व्यंकट लक्ष्मणराव मक्तेदार, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी मंडळ अधिकारी सोनखेड ने. तहसील कार्यालय लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 06 / 2023 कलम 379, 427, 34 भादवी, पर्यावरण संरक्षण कायदा कलम 5, गौण खनिज उत्खन्न कायदा कलम 4,11 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1916 पांपटवार, मो. क्र. 9823079789** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)मांडवी :–**दिनांक 06.01.2023 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **बोथ फाटा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा ग्राहाकाकडुन कापुस विकत घेण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून तुम्ही आमचे विरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी का आले म्हणुन आरोपीने हातात गोटा घेवुन फिर्यादीचे मोठे बाबा नामदेव राठोड यांचे डोक्यात घातला तेंव्हा फिर्यादीचे मोठे बाबा रोडवर पडल्याने फिर्यादी व फिर्यादीचे वडील हे जखमीस उचलत असताना यातील आरोपीतांनी फिर्यादी व फिर्यादीचे वडीलास लाथा बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली व फिर्यादीचे मोठे बाबास दगडाने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी निलेश विठ्ठल राठोड, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. सखरूनाईक तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरन 02 / 2023 कलम 326, 323, 504, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1657 कदम, मो. नं. 7218242057** हे करीत आहेत.

**2)मांडवी :–**दिनांक 06.01.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **बोथ फाटा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा नेहमी प्रमाणे आपले कापड दुकान चालविण्यासाठी उमरी बाजार येथे जात असतांना बोथ फाटा येथे सक्रु नाईक तांडा येथील प्रेम आडे व प्रेम राठोड यांचे कापुस खरेदी करण्याच्या कारणावरून वाद होवुन भांडणे चालु अतसांना फिर्यादी हा मध्यस्थी होवुन भांडणे सोडविण्यास गेला असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून दगडाने फिर्यादीचे डोक्यात मारून डोके फोडले व लाथा बुक्यानी मारहाण केली. वगैरे **फिर्यादी अरविंद दत्तराम आडे, वय 41 वर्षे, व्यवसाय कापड दुकान रा. सखरू नाईक तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरन 03 / 2023 कलम 324, 323, 504, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1657 कदम, मो. नं. 7218242057** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**1)सोनखेड :–** दिनांक 29.12.2022 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **निळा ते आंबेसांगवी रोडवरील बंद पडलेल्या दुधडेअरी समोर वळणावर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे व्यंकटराव भुजंगा हावरगे, वय 60 वर्षे, रा. हरसद ता. लोहा** असे माळेगाव यात्रेनिमित्त जात असतांना यातील आरोपीने आपले ताब्यातील इनोव्हा कार क्रमांक एमएच–14 / एआर–0111 ही निळा ते अंबेसांगवी रोडवर हयगई व निष्काळजीपणे भरधाव वेगात वळणावर चालवुन कार ही रोडच्या डाव्या बाजुस पलटी करून यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला व यातील फिर्यादी व साक्षीदार यास जखमी केले. वगैरे **फिर्यादी शिवशंकर त्र्यंबक कदम, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेलगांव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 05 / 2023 कलम 279, 337, 338, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री विशाल भोसले, मो.क्र. 9960157059** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड